245

क्रमांक : मुमप्रविप्रा/बैठक/४९.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

दिनांक : २३ जानेवारी, १९८९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खालील बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे :

(१) दिनांक १९ ऑगस्ट १९८८ रोजी झाली ४९ वी बैठक

(२) दिनांक २९ ऑगस्ट १९८८ रोजी झालेली ४९ वी (स्थगित) बैठक.

सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकत असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्री. वि. आसगावकर
23/1/89
( श्र. वि. आसगावकर )
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य.

2/1/89

No. BMRDA/MTG/49.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th Floor, Bandra(East),
BOMBAY- 400 051.

Date : 23rd January, 1989.

The minutes of the following meetings of the Bombay Metropolitan Region Development Authority are enclosed herewith :

1) 49th Meeting held on 19th August, 1988.

2) Adjourned 49th Meeting held on 29th August, 1988.

2. Members are requested kindly to intimate their objection, if any.

( S.V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To,

All Members.

२५७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
४९व्या बैठकीचे कार्यवृत्त

---

दिनांक : १९ ऑगस्ट, १९८८ (शुक्रवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता

सभास्थान : समिती कक्ष, ५वा मजला, मंत्रालय

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| डॉ. इक्बाल जमखानवाला, नगर विकास मंत्री | अध्यक्ष |
| डॉ. वा. रा. शेरेकर, गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री. बी. ए. देसाई, नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. दिवाकर ना. रावते अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि. पटेल नगरसेविका | सदस्या |
| श्री. भगवंतराव अ. पाटील नगरसेवक | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. स. शं. तिनईकर महापालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. दिनेशकुमार जैन शासनाचे सचिव, नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री. के. नलिनाक्षन् व्यवस्थापकीय संचालक, सिडको | सदस्य |

..२/-

श्री.एस.आर.काकोडकर, सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

निमंत्रित

श्री.का.रा.शानभाग,
वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

प्रारंभी अध्यक्षांनी गृहनिर्माण मंत्री डॉ.वा.रा.शेरेकर व नगर विकास राज्यमंत्री श्री.बी.ए.देसाई यांचे प्राधिकरणाचे पदाधिष्ठित नवे सदस्य म्हणून हार्दिक स्वागत केले.मुंबई महानगर प्रदेशाच्या समस्यांची सखोल जाण व सार्वजनिक जीवनातील समृध्द अनुभव असलेले हे दोन्ही सदस्य प्राधिकरणाच्या विचारविमर्शात व निर्णयात मोलाची भर घालतील असा विश्वास अध्यक्षांनी व्यक्त केला.

तसेच माजी नगर विकास व गृहनिर्माण मंत्री डॉ.व्ही.सुब्रमण्यन यांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून आणि माजी नगर विकास राज्यमंत्री श्री.विलास वि.सावंत यांनी प्राधिकरणाचे सदस्य या नात्याने बजावलेल्या बहुमोल सेवेची लेखी नोंद अध्यक्षांनी घेतली.

बाब क्र.१ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मागील (४८व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

'अ' प्रवर्गाच्या जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर पात्र इमारतींची पुर्नबांधणी, अशा इमारतीतील रहिवाशांची सहकारी गृहनिर्माण संस्था मालमत्तेचा मालक इत्यादींनी करण्याबद्दलच्या प्रस्तावासंबंधातील बाब क्र.१६ बाबतच्या कार्यवृत्ताच्या संदर्भात श्री.चंद्रशेखर प्रभू यांनी अशी सूचना केली की, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने मान्य केल्याप्रमाणे ठराव क्र.३८१ च्या परिच्छेद १ मध्ये शर्त (ह) म्हणून पुढील शर्त समाविष्ट करण्यात यावी आणि ठरावाला जोडलेल्या जोडपत्र १ व २ मध्ये तदानुषंगिक बदल सुध्दा करण्यात यावेत :

"(ह) उपकर इमारतीतील रहिवाशांची सहकारी गृहनिर्माण संस्था आधीच तयार झाली नसेल आणि रहिवाशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला मालकी हक्क प्रदान करणे व प्रस्तावित संस्थेने मालमत्तेच्या मालकाला पैसे चुकते करणे यासंबंधीच्या आवश्यक औपचारिक बाबी पूर्ण करण्यात आल्या नसतील तरच केवळ अशा मालमत्तेचा पुनर्विकास करण्याची उपकर इमारतीतील रहिवाशी, इमारतीचा मालक, इत्यादींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून आलेली योजना स्वीकारण्यात येईल."

...3/-

श्री.प्रभू यांची सूचना प्राधिकरणाने मान्य केली.कार्यवृत्तात त्यानुसार फेरबदल करून ते कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र.२ : गलिच्छ वस्ती रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर गलिच्छ वस्ती रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना जादा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे - कलम १३ अनुसार काढलेल्या अधिसूचनेच्या कक्षेतून अशा प्रकारची प्रकरणे वगळण्यासाठी अधिसूचनेमध्ये दुरुस्ती

चर्चेनंतर प्राधिकरणाने पुढील ठराव संमत केला :

ठराव क्र.३८३ :

"असा ठराव संमत करण्यात येत आहे की,कार्यकारी समितीने शिफारस केल्याप्रमाणे,(१) शासनाच्या किंवा नगरपालिकेच्या जमिनीवरील गलिच्छ वस्ती रहिवाशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना,अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकाच्या २५% पर्यन्त अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक प्रत्येक गलिच्छ वस्ती रहिवाशास १६.९० चौ.मी.चा (१८० चौ.फूट) गाळा पुरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असेल तरच देण्यात यावा, तसेच (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम १३ अन्वये काढलेल्या अधिसूचनेच्या कक्षेतून अशी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक देण्याची प्रकरणे वगळण्यात यावीत.या दोन बाबीस प्राधिकरण याव्दारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव संमत करण्यात येत आहे की,मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४,कलम १३,पोटकलम (१) व्दारा प्रदान केलेल्या आपल्या अधिकारांचा आणि या संदर्भात सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून हे प्राधिकरण,बाब टिप्पणीस (Item Note ) जोडपत्र तीन म्हणून जोडलेली प्रारुप अधिसूचना काढण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की,उक्त अधिनियमाच्या कलम ७-ए अन्वये दिलेल्या शक्तीचा वापर करून महानगर आयुक्त यांना,उक्त अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात आपल्या सहीने अभिप्रमाणित करून प्रसिध्द करण्यास याव्दारे प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.३ : पश्चिम द्रुत महामार्ग आणि वांद्रा रेल्वे स्टेशन (पूर्व) यामधील अनंत काणेकर मार्गाची प्रस्तावित रस्ता रुंदी आणि सुधारणा

बाब टिप्पणीत दिलेला प्रस्ताव मान्य करून प्राधिकरणाने पुढील ठराव संमत केला :

ठराव क्र.३८४ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) यांच्या कलम ४०(१)(सी) अनुसार वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे उक्त अधिनियमाच्या कलम ४०(३) तसेच कलम ११३ (ए) (८) आणि कलम ३७ खालील आपल्या अधिकाराचा आणि या संदर्भात त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन याव्दारे, राज्य शासनाने अधिसूचना क्र.बीकेआर-११७७/२६२-युडी-५, दि.९.०४.१९७९ अनुसार मंजूर केलेल्या नियोजन प्रस्तावांमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'डी' ब्लॉकमध्ये येणारा आणि पश्चिम द्रुत महामार्ग व पश्चिम रेल्वेचा डी-१ ब्लॉक यांना जोडणारा अनंत काणेकर मार्गाचा भाग ९० फुटापासून 120 फुटापर्यंत रुंद करण्याच्या दृष्टीने फेरबदल करण्यास व त्यासंबंधी आक्षेप व सूचना मागविण्यासाठी शासकीय राजपत्रात व दोन स्थानिक वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खालील आपल्या शक्तीचा व या संदर्भात त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण, याव्दारे अशी नोटीस शासकीय राजपत्रात आणि दोन स्थानिक वृत्तपत्रात, म्हणजे 'टाईम्स ऑफ इंडिया' व 'लोकसत्ता' यामध्ये प्रकाशित करण्यास आणि नोटीस प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या फेरबदलाविषयी आक्षेप व सूचना मागविण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १३९ अनुसार आणि मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७-ए अनुसार मिळालेल्या शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण याद्वारे, महानगर आयुक्त यांना वरील खंडानुसार उक्त नोटीस प्रसिध्द करण्यास प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम १५१(३) अनुसार मिळालेल्या शक्तीचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे असा आदेश देत आहे की, या बाबतीत जे आक्षेप/सूचना मिळतील त्यावर महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्ताव्दारे नामनिर्देशित केलेल्या व वरिष्ठ नियोजकहून कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने विचार करावा आणि ~~xxxxxx~~ आक्षेप व सूचना सादर करणाऱ्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यावर त्यांनी आपला अहवाल प्रस्तावित फेरबदलासह उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अनुसार राज्य शासनाच्या अंतिम मंजुरीसाठी पाठवावा.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, प्रस्तावित केल्याप्रमाणे; वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या अनंत काणेकर मार्गाच्या रुंदीकरणाच्या खर्चापोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सहाय्य म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास निधीमधून रु.७ लाख एवढी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्याचा प्रस्ताव हे प्राधिकरण याव्दारे मान्य करीत आहे."

बाब क्र.४ : बॅक-बे पुन:प्रापण योजना –
(चालू) ब्लॉक तीन ते सहा यासाठी प्रारुप विकास योजना

४.१ प्राधिकरणाने दि.४ सप्टेंबर,१९८७ रोजी झालेल्या आपल्या ४५व्या बैठकीत खालील प्रारुप विकास आराखडा प्रस्तावांस मान्यता दिल्याची नोंद घेतली :

(१) इंदिरा गांधी पुतळयासाठी बगिचा :

स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांचा भव्य पुतळा उभारण्याकरिता व त्यासभोवती बगिचा तयार करण्याकरिता नरिमन पॉईन्ट येथील एनसीपीए भू खंडाच्या दक्षिणेस सुमारे १.९६ हेक्टर क्षेत्राचे पुन:प्रापण.

(२) भू खंड क्र.१९६ – बेस्ट :

भू खंड क्र.१९६ बेस्ट उपक्रमासाठी तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या बसगाडयांसाठी राखून ठेवण्याचा प्रस्ताव.

(३) जनरल भोसले मार्ग व नेताजी सुभाष मार्ग यांना जोडणारा ६० फूट रुंदीचा पूर्व-पश्चिम उपमार्ग

जगन्नाथ भोसले मार्गावरील व मंत्रालयासमोरील मादाम कामा रोडवरील वाहतुकीची दाटी कमी करण्याच्या दृष्टीने, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे उपरोक्त उपमार्गाबद्दलचा प्रस्ताव मान्य करण्यात आला होता.

४.२ त्यानंतर प्राधिकरणाने पुढील प्रारुप विकास आराखडा प्रस्तावांवर विचार करुन निर्णय घेतले :

(१) टाटा इलेक्ट्रीक कंपनीच्या वीजग्रहण केंद्रासाठी भूखंड :

महानगर आयुक्तांनी असे नमूद केले आहे की, बॅक-बे रिक्लमेशन स्कीममध्ये जलद गतीने होणारी विजेच्या मागणीची वाढ विचारात घेता या क्षेत्रातील वाढत्या वीज भारांची गरज भागविण्यासाठी एक उच्च दर्जाचे विश्वसनीय व सुरक्षित असे इएचव्ही बल्क वीज ग्रहण केंद्र स्थापन करणे आवश्यक आहे. त्यांनी असे दाखवून दिले की, बॅकबे येथे 220 कि.वो.शक्तीचे वीजग्रहण केंद्र स्थापन करण्याचा टाटा इलेक्ट्रीक कंपनीचा प्रस्ताव आहे. टाटा कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे मुंबईच्या

ग्राहकांना एकूण काटकसरीने वीजपुरवठा करण्यासाठी बॅकबे रेक्लमेशन स्कीमच्या ब्लॉक तीनमधील भूखंड १४९-१५० वरील बेस्टच्या प्रस्तावित वितरण केंद्राच्या अगदी निकट हे इएचव्ही केंद्र उभारणे अत्यावश्यक आहे. टाटा इलेक्ट्रीक कंपनीने आपली गरज ५.००० चौ.मीटर भूखंडाची असल्याचे सुचित केले असले तरी मागाहून त्यांनी असे स्पष्ट केले की/बॅकबे रेक्लमेशन स्कीममध्ये सुयोग्य जागेची तीव्र टंचाई आहे हे लक्षात घेता, किमान ३५००चौ. मीटरच्या भूखंडावर निरनिराळी विद्युत् सामग्री बसविण्यासाठी अनेक मजली इमारत बांधून प्रस्तावित इएचव्ही बल्क वीजग्रहण केंद्राची सोय करता येईल. टाटा इलेक्ट्रीक कंपनीने असेसुध्दा म्हटले आहे की, प्रस्तावित वीजग्रहण केंद्र हे स्वयंचलित संरक्षक व नियंत्रक साधनांनी पूर्णपणे सुरक्षित राहील आणि पर्यावरणाच्या दृष्टीनेही ते सुसंगत असेल. टाटा इलेक्ट्रीक कंपनीने आपल्या दि.९.८.१९८७ च्या पत्रात आणखी असा खुलासा केला आहे की, प्रस्तावित वीजग्रहण केंद्र हे अंशतः भूमिगत राहणार असल्याने संपूर्ण भूखंडाचे त्यांना पुनः प्रापण करावे लागणार नाही. म्हणून टाटा इलेक्ट्रीक कंपनीच्या इएचव्ही वीजग्रहण केंद्राची सोय करुन देण्यासाठी, बॅकबे रेक्लमेशन स्कीममधील ब्लॉक क्र.तीन येथील भूखंड क्र.१४९-१५० च्या पश्चिमेस सुमारे ३५०० चौ.मीटरचा तुकडा निर्देशित करावा असे प्रस्तावित केले होते.

श्री.चंद्रशेखर प्रभू यांनी असे दाखवून दिले की विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्राबाहेर असलेल्या जगन्नाथ भोसले मार्गाच्या पूर्व बाजूस वीजग्रहण केंद्रासाठी यापूर्वी शासनाच्या नगर विकास विभागाने एक भूखंड राखून ठेवला होता. म्हणून आता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या जगन्नाथ भोसले मार्गाच्या पश्चिम बाजूकडील भूखंड वीजग्रहण केंद्रासाठी राखून ठेवण्याची शासनाची सूचना चमत्कारिक आहे. वीजग्रहण केंद्रासाठी अशी राखून ठेवलेला भूखंड, डॉ.राजा रामण्णा यांनी स्थापन केलेल्या खाजगी सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्याची शासनाची इच्छा असल्यामुळे मर्जीखातर शासनाने आरक्षणात बदल केला असा त्यांनी आरोप केला आहे. सार्वजनिक उपयुक्ततेऐवजी खाजगी हितसंबंधांना अधिक महत्व देण्यास त्यांनी तीव्र आक्षेप घेतला. या संबंधात असे दाखवून देण्यात आले की १९८१ मध्येच टाटा इलेक्ट्रीक कंपनीने शासनाच्या महसूल व वन विभागाकडे अशी विनंती केली होती की जगन्नाथ भोसले मार्गाच्या पूर्वेकडील भूखंड (विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कक्षेबाहेर असलेला) इएचव्ही वीजग्रहण केंद्रासाठी नेमून देण्यात यावा. श्री.चंद्रशेखर प्रभू यांनी इएचव्ही बल्क वीजग्रहण केंद्रासाठी बॅकबे रिक्लमेशन स्कीमच्या ब्लॉक तीनमध्ये प्रस्तावित्या-प्रमाणे जागा निर्देशित करण्यास तीव्र विरोध केला.

या बाबीवर बरीच चर्चा झाली. महापालिका आयुक्त. श्री. तिनईकर यांनी असे सांगितले की, बेस्टच्या प्रस्तावित वीज वितरण केंद्रालगत टाटा इलेक्ट्रीक कंपनीचे वीजग्रहण केंद्र उभारले गेले तर ते आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होईल हे लक्षात घेऊन बेस्टला आधीच नेमून दिलेल्या भूखंड १४९-१५०च्या जवळपास योग्य भूखंड राखून ठेवण्याबद्दलची टाटा इलेक्ट्रीक कंपनीची सध्याची विनंती वाजवी आहे किंवा काही एवढयाच मुद्दयाचा विचार करण्यात यावा.

आणखी चर्चा केल्यानंतर, प्राधिकरणाने असा निर्णय घेतला की, बॅकबे रेक्लमेशन भागात वीजेला खूपच मागणी असून तेथील बिकट वीजुपरवठयाची गरज भागविण्याच्या दृष्टीने टाटा इलेक्ट्रीक कंपनीचे वीज ग्रहण केंद्र हे सार्वजनिक उपयुक्ततेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने, भूखंड १४९-१५० च्या पश्चिमेस सुमारे ३५०० चौ.मीटरचा भूखंड प्रस्तावित्याप्रमाणे निर्देशित करण्यात यावा.

(२) <u>एनसीपीए भूखंड</u> :

या बाबीवरील विचार लांबणीवर टाकण्यात आला.

अध्यक्षांचे आभार मानून बैठक स्थगित करण्यात आली.

----

# MINUTES OF THE 49TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 19th August, 1988 (Friday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : Committee Room, 5th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Dr. Ishaq Jamkhanwala, Minister for Urban Development. | - Chairman |
| Dr. W.R. Sherekar, Minister for Housing. | - Member |
| Shri B.A. Desai, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Diwakar N. Raote, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri S.S. Tinaikar, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri K. Nalinakshan, Managing Director, C.I.D.C.O., Bombay. | - Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

INVITEE :

Shri K.R. Shanbhogue, Financial Adviser, BMRDA.

At the outset, the Chairman cordially welcomed Dr. W.R. Sherekar, Minister for Housing and Shri B.A. Desai, Minister of State for Urban Development who were inducted as

.....2/-

new members of the Authority. Chairman expressed confidence that with their deep knowledge of the problems of the Bombay Metropolitan Region and rich experience in public life, they would make a valuable contribution to the deliberations and decisions of the Authority.

The Chairman also placed on record the valuable services rendered by Dr. V. Subramanian, ex-Minister for Urban Development & Housing when he was the Chairman of the Authority and by Shri Vilas V. Sawant, ex-Minister of State for Urban Development as member of the Authority.

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (48th) Meeting of the Authority.

Referring to the minutes in respect of Item No.16 concerning the proposals regarding reconstruction of old and dilapidated cessed buildings of category 'A' by co-operative housing society of the occupiers of the cessed building, the owner of the property, etc., Shri Chandrashekhar Prabhu suggested that as agreed to by the Housing & Special Assistance Department, the following condition should be incorporated as condition (h) in para.1 of Resolution No.381 and consequential changes be also made in Annexures I and II appended to the Resolution :

> "(h) A scheme of redevelopment of a property by a co-operative housing society of the occupiers of a cessed building, the owner of the property, etc., will be accepted only if the co-operative society of occupiers has not already been formed and if the requisite formalities for conferring ownership rights on the co-operative housing society of occupiers and the payment to the property owner by the proposed society have not been completed."

The Authority agreed to Shri Prabhu's suggestion. The minutes were accordingly modified and confirmed.

Item No.2 : Grant of additional F.S.I. to co-operative housing societies of slum dwellers for facilitating their rehabilitation on the land occupied by them - Amendment of Section 13 Notification to exclude cases of this type from the purview of the Notification.

After discussion, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.383 :

"Resolved that as recommended by the Executive Committee, the Authority hereby approves (i) grant of additional F.S.I. upto 25% of the permissible F.S.I. to co-operative housing societies of slum dwellers located on Government or Municipal lands provided it is absolutely necessary to grant them such additional F.S.I. for providing each slum dweller 16.90 sq.mtrs(180 sq.ft.) tenement; and (ii) to exclude such cases of grant of extra F.S.I. from the purview of Notification issued under Section 13 of the BMRDA Act, 1974.

"Resolved further that the Authority in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, approves of the issue of draft Notification appended as Annexure III to the Item Note.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to have the said Notification published in the Maharashtra Government Gazette duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7-A of the said Act."

Item No.3 : Proposed widening and improvement of Anant Kanekar Marg between Western Express Highway and Bandra(East) Railway Station.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.384 :

"Resolved that the Bombay Metropolitan Region Development Authority, being the Special Planning Authority

for the Bandra-Kurla Notified Area, appointed under Section 40(1)(c) of the MR&TP Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) hereby, in exercise of its powers under Section 40(3) read with Section 113(A)(8) jointly with Section 37 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, approves of a notice being published in the official Gazette and in two local newspapers to invite objections and suggestions to the planning proposals sanctioned by the State Government under Notification No.BKR-1177/262-UD-5, dated 9-4-1979, being modified so as to widen the portion of the Anant Kanekar Marg falling within 'D' Block of Bandra-Kurla Complex and joining Western Express Highway and D-1 Block of Western Railway, from 90 feet to 120 feet, as proposed.

"Resolved further that the Authority in exercise of its powers under Section 37 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, hereby approves of a notice being published in the official Gazette and in 2 local newspapers, viz., 'The Times of India' and the 'Loksatta', inviting objections and suggestions from the public in respect of such modifications not later than one month from the date of such Notice.

"Resolved further that the Authority in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 7-A of the BMRDA Act, 1974, hereby authorises the Metropolitan Commissioner to publish the Notice in accordance with the foregoing clauses.

"Resolved further that the Authority in exercise of powers under Section 151(3) of the said Act, hereby directs that the Metropolitan Commissioner or an officer not below the rank of a Senior Planner nominated by the Metropolitan Commissioner, shall consider the objections/ suggestions which may be received in this behalf, and after giving hearing to parties presenting any objections and suggestions, shall submit his report to the State Government along with the proposed modifications for final sanction in terms of Section 37 of the said Act.

"Resolved further that the Authority hereby approves the proposal for payment to the Municipal Corporation

259

of Greater Bombay a sum of Rs.7 lakhs, from the Bombay Metropolitan Region Development Fund as BMRDA's contribution towards the cost of widening of Anant Kanekar Marg, as mentioned in para.1 above, as proposed."

Item No.4(Contd.): Draft Development Plan for Backbay Reclamation Scheme - Blocks III to VI.

4.1. The Authority noted that in its 45th Meeting, held on the 4th September, 1987 it had accorded approval to following draft Development Plan proposals :

(1) Garden for Indira Gandhi Statue :

To reclaim an area admeasuring about 1.96 hectares to the south of NCPA plot, Nariman Point, for erection of a life size statue of Smt. Indira Gandhi with a garden around it.

(2) Plot No.196 - BEST :

The proposal to earmark plot No.196 for BEST as also for parking of MTDC buses.

(3) 60' wide East-West by-pass Road connecting Gen. Bhonsale Marg and Netaji Subhash Marg.

The proposal of the above mentioned by-pass road as proposed in the Item Note was approved with a view to easing traffic congestion on Jagannath Bhosale Marg and on Madame Cama Road in front of Mantralaya.

4.2. The Authority then considered and took decisions on the following draft Development Plan proposals :

(i) Plot for Receiving Station of Tata Electric Co.

The Metropolitan Commissioner stated that in view of the rapid load growth experienced in Backbay Reclamation Scheme (BBRS) it was considered necessary to establish an EHV bulk Receiving Station in the area to meet the loads with a high degree of reliability and security. He pointed out that M/s. Tata Electric Co. (TEC) have a proposal to establish a 220 KV Receiving Station at Backbay. According to TEC, in order to achieve overall economy of power supply to the consumers of Bombay, it is essential that this EHV station should be located in close proximity of BEST's proposed

distribution centre on Plot 149-150 in Block III of BBRS. Eventhough TEC had indicated that their requirement was for a plot of 5,000 square metres they had subsequently clarified that in view of extreme paucity of suitable space in BBRS, they would accommodate the proposed EHV bulk Receiving Station on a plot with a minimum area of 3500 square metres with a multi-storey layout for various electrical equipments. They had also stated that the proposed Receiving Station would be completely safe with automatic protection and controls and that it would also be environmentally compatible. TEC had further clarified in their letter, dated 9.8.1987 that they would not be required to reclaim the whole plot as the proposed Receiving Station would be partly underground. It was, therefore, proposed to carve out and earmark a plot of about 3500 square metres to the west of plots Nos.149-150 in Block III of BBRS earlier allotted to BEST, for accommodating the EHV Receiving Station of TEC.

Shri Chandrashekhar Prabhu pointed out that earlier Government in Urban Development Department had reserved a plot for a power receiving station on the eastern side of Jagannath Bhosale Marg which is outside the jurisdiction of BMRDA as the Special Planning Authority. It was, therefore, strange that Government had now suggested that that reservation for power receiving station should be shifted on a plot of land on the western side of Jagannath Bhosale Marg which falls within the purview of BMRDA as the Special Planning Authority (SPA). He alleged that Government desired this change of reservation in order to favour a private co-operative housing society floated by Dr. Raja Ramanna to whom it wishes to allot the plot earlier reserved for Receiving Station. He strongly objected to private interest being allowed to prevail over public utility. In this connection it was pointed out that as early as in 1981 TEC had approached the Government in Revenue & Forests Department with a specific request that the plot of land on the east side of Jagannath Bhosale Marg (which falls outside

261

the purview of BMRDA as SPA) should be allotted to them for putting up a EHV Receiving Station. Shri Chandrashekhar Prabhu, therefore, strongly opposed the proposal to shift the reserva- tion for EHV bulk receiving station to the proposed loca' in Block III of BBRS.

There was considerable discussion on this matter Municipal Commissioner, Shri Tinaikar stated that the relevant issue to be considered was whether TEC's present request to earmark a suitable plot of land in the proximity of plots 149-150 already allotted to BEST, was reasonable or not, taking into account the fact that it would be advantageous from economic point of view if TEC's Receiving Station is located adjacent to BEST's proposed power distribution centre.

After further discussion, the Authority decided that since TEC's power receiving station would be of a vital public utility which would serve the critical power needs of Backbay Reclamation Area which is an extremely high demand area, the proposal to earmark a plot of land admeasuring approx. 3500 square metres to the west of Plots Nos.149-150 should be approved as proposed.

(ii) N.C.P.A. Plot :

Consideration of the item was deferred.

The meeting adjourned with a vote of thanks to the Chair.

- - - -